दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक २२ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.२३ एप्रिल २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## डोलवी एमआयडीसी प्रकल्प रद्द करा ; शेतकऱ्यांची मागणी



**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील नियोजित डोलवी औद्योगिक क्षेत्रात खारजांभेळा, खारचिर्बी, खारढोंबी, वावे, खारकारावी, खारमाचेळा, खारघाट, बेणेघाट, कोळवे, डोलवी, काराव, वावे या गावातील जमिन संपादित करण्यात येणार आहे. येथील प्रकल्पग्रस्त शेतक–यांनी हा प्रकल्प रद्द करावा ही मागणी शासनाकडे केली होती. शासनाने या प्रकल्पातील खारजांभेळा, खार चिर्बी, खारढोंबी ही गावे वगळण्याचा निर्णय घेतला तर वावे, खारकारावी, खारमाचेळा, खारघाट, बेणेघाट, कोलवे, डोलवी, काराव या गावातील जमीन संपादित करण्यात येणार आसल्याने यासंदर्भत पेण उपविभागिय कार्यालयात या भागातील शेतकऱ्यांची बैठक आयौजित करण्यात आली होती, मात्र या प्रकल्पाला येथील शेतक–यांनी विरोध दर्शविला असुन हा प्रकल्प रद्द करावा अशी मागणी केली.

या बैठकीला आमदार रवीशेठ पाटील, उपविभागिय अधिकारी विठ्ठल ईनामदार,औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी रंविद्र बोबले, पेण पंचायत समिती सदस्य प्रदिप म्ह–त्रे, परशुराम म्हात्रे हरिचंद्र चवरकर, गजानन पेढवी, निलेश म्हात्रे, गणेश पाटील, सुशिल कोठेकर आदि शेतकरी उपस्थित होते. येथिल शेतक–यांचा या प्रकल्पला विरोध आसल्याने हा प्रकल्पच रद्द करावा असे आमदार रविशेठ पाटील यांनी यावेळी सांगितले,

येथिल शेतक–यांनी या प्रकल्पाचे जमिनीचे मोजणीसाठी सहकार्य करावे असे उपविभागिय अधिका–यांनी सांगितले असता हा प्रकल्पच नको हा प्रकल्पच रद्द करावा अशी मागणी शेतक–यांनी केली. येथील शेतक–यांची जी मागणी आहे ती शासनाला कळविण्यात येणार असल्याचे उपविभागिय अधिकारी विठ्ठल ईनामदार यांनी यावेळी सांगितले.

# शिवसैनिकांनो आपले आभार, आपण घरी जावं, इकडे येण्याची कुणी हिम्मत करणार नाही : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंचं निवासस्थान असलेल्या मातोश्रीबाहेर हनुमान चालीसा पठण करण्यासाठी मुंबईत येऊन पोहोचले आहेत. कितीही धमक्या द्या, कारवाई करा पण आम्ही उद्या सकाळी ९ वाजता मुख्यमंत्र्यांच्या मातोश्री निवासस्थानी जाऊन हनुमान चालिसेचं पठण करणारच, असा पवित्रा राणा दाम्पत्यांनी व्यक्त केला. मुंबईत दुपारी ३ वाजता पत्रकार परिषद घेऊन त्यांनी आपली भूमिका जाहीर केली. राणा दाम्पत्याच्या ठाम निर्धारानंतर शिवसैनिक देखील कमालीचे आक्रमक झाले आहेत. राणांच्या पत्रकार परिषदेनंतर हजारो शिवसैनिकांनी मातोश्रीबाहेर जमायला सुरुवात केली. 'उद्धवसाहेब आगे बढो, हम तुम्हारे साथ है', 'शिवसेनेचा विजय असो', अशा घोषणांनी मातोश्रीचा परिसर दणाणून गेला. दरम्यान ५ वाजताच्या सुमारास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे 'वर्षा'वरुन 'मातोश्री'कडे जायला निघाले. 'मात–ोश्री' बंगल्याच्या परिसरात येताच त्यांनी जमलेल्या हजारो शिवसैनिकांना हात उंचावून अभिवादन केलं. संध्याकाळी ७ वाजता मातोश्रीवर सेना नेत्यांची विशेष बैठक पार पडली. या बैठकीनंतर उद्धव ठाकरे पुन्हा बंगल्याच्या बाहेर आले. यावेळी शिवसैनिकांचे आभार व्यक्त करताना, 'तुम्ही सकाळपासून इथे जमलेला आहात. आता आपण घरी जावं. इकडे येण्याची कुणी हिम्मत करणार नाही', असं मुख्यमंत्री म्हणाले.



राणा दाम्पत्याच्या आक्रमक पत्रकार परिषदेनंतर संध्याकाळी ५ वाजताच्या सुमारास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे वर्षा या शासकिय निवासस्थानावरुन मातोश्रीकडे निघाले. तिथे मातोश्री परिसरात हजारो शिवसैनिक जमले होते. मुख्यमंत्र्यांनी गाडी थांबवून हात उंचावून शिवसैनिकांना नमस्कार केला. तिथून ते मातोश्रीवर महत्त्वाच्या बैठकीसाठी गेले. राणा दाम्पत्याच्या इशाऱ्यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर, शिवसेना नेते अनिल परब, खासदार अनिल देसाई, नेते वरुण सरदेसाई यांच्यात महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत उद्या राणांना कसं रोखायचं, कोणत्या पदाधिकाऱ्याकडे काय जबाबदारी द्यायची, याविषयी चर्चा झाली.

तासाभराच्या बैठकीनंतर उद्धव ठाकरे मातोश्रीबाहेर आले. सकाळपासून मातोश्रीबाहेर गर्दी केलेल्या शिवसैनिकांचे त्यांनी आभार मानले. आपण आता घरी जावं. या परिसरात येण्याची कुणी हिम्मत करणार नाही, असं मुख्यमंत्री शिवसैनिकांना म्हणाले. मात्र राणांविरोधात आम्ही रात्र जागून काढू, असा निर्धार काही महिला पदाधिकाऱ्यांना मुख्यमंत्र्यांना बोलून दाखवला.

मुंबई पोलिसांनी राणा दाम्पत्याला १४९ ची नोटीस बजावली असली तरी आता उद्या ते मातोश्रीवर जाण्यावर ठाम आहेत. आम्ही मातोश्रीवर शांततेत हनुमान चालिसा पठण करण्यासाठी आलो आहोत. पोलिसांनी आम्हाला घरातून बाहेर पडू नका, यासाठी नोटीस दिली आहे. आम्ही शांतता आणि धार्मिक उद्देशाने आला आहोत. त्यामुळे आम्ही कोणत्याही परिस्थितीत उद्या सकाळी ९ वाजता मातोश्रीवर जाणारच, असा निर्धार आमदार रवी राणा यांनी व्यक्त केला.

## पनवेल तालुका पोलिसांच्या पथकाने केली जातीय दंगा काबू योजनेची रंगीत तालीम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सध्याच्या महाराष्ट्रासह देशभरात होत असलेल्या विविध घटनांच्या पार्श्वभूमीवर सर्तकता म्हणून पनवेल तालुका पोलिसांच्या पथकाने आज त्यांच्या हद्दीतील मौजे : वावंजे या ठिकाणी जातीय दंगा काबू योजनेची रंगीत तालीम केली.

पोलीस उपायुक्त परिमंडळ २ चे शिवराज पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनवणे, पनवेल विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुका पोलीस स्टेशन हद्दीतील मौजे वावंजे याठिकाणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांच्या नेतृत्वाखाली जातीय दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली. सदर दंगा काबू योजनेच्या रंगीत तालमीत पो ठाणे कडील ०२ पोनि, ०१ सपोनि, ०२ पोउपनि, १५ पोलीस अंमलदार, तसेच तळोजा एमआयडीसी कडील अग्निशमन दलाचे १ अधिकारी व ०५ फायरमॅन टेंडर व्हेन व ॲम्ब्युलन्स असे हजर होते.



## संक्षिप्त...

### गुणरत्न सदावर्तेसह ११५ एसटी कर्मचाऱ्यांना जामीन मंजूर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

सिल्व्हर ओक हिंसक आंदोलन प्रकरणातील आरोपी गुणरत्न सदावर्ते आणि ११५ आंदोलक कर्मचाऱ्यांना अखेर जामीन मिळाला आहे. सदावर्ते यांना ५० हजार रुपये रोख हमी आणि तितक्याच रकमेचा हमीदार तर सर्व ११५ कर्मचाऱ्यांना प्रत्येकी १० हजार रुपयांच्या वैयक्तिक हमीवर जामीन मंजूर करण्यात आला आहे.

खरंतर, या प्रकरणात सद–ावर्ते यांच्यासह अनेक कर्मचारीही अडकले होते. कर्मचारी यातून सुटले असले तरी सदावर्ते मात्र कोल्हापुरात चांगलेच अडकले आहेत. तिथे त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. एसटी कर्मचाऱ्यांचे नेते झा–लेले सदावर्ते आता तरी बाहेर येऊ शकतात का? पुढचा मुक्काम कुठे असेल आणि जामीन मिळालेल्या एसटी कर्मचाऱ्यांचं काय होईल? हे पाहणं आता महत्त्वाचं आहे.

दरम्यान, पवारांच्या घरावर जो मोर्चा काढण्यात आला होता. त्याला जबाबदार म्हणून सदावर्ते असे काही अकडलेत, की त्यांचे बाहेर पडण्याचे मार्ग खडतर होत चालले आहेत. एक झालं की दुसऱ्या गुन्ह्यात ते अडकत चालल्याचं पाहायला मिळतं. सातारा कोर्टाने जामीन दिला, पण त्यानंतर कोल्हापुरात त्यांना नेण्यात आलं. आता कोल्हापुरात जामीन मिळेपर्यंत अकोला पोलीसही ताबा घेण्यासाठी रांगेत आहेत.

**पाहिजेत**

मराठी, इंग्रजी टायपिंगचे तसेच इंटरनेट ज्ञान असलेले मुले–मुली पाहिजेत.

: संपर्क :
९७६९०११६६७

## खोपोली शहरात पार्किंगची समस्या गंभीर ; रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दुकानदारांचे अतिक्रमण

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली शहरातील वाढत्या लोकसंख्येबरोबरच येथील वाहनांची संख्याही वाढत आहे. शहरातील बाजारपेठेतील मुख्य रस्त्यांवर दुतर्फा वाहने पार्क करण्यासाठी रस्त्यावर दुतर्फा पांढऱ्या रंगाच्या पट्याच्या आत वाहने उभी केली जातात. जर कोणी रस्त्यांवर वाहने उभी केली तर पोलीस ट्रो करून वाहने जप्त करून पोलीस ठाण्यात जमा करीत दंड वसूल करतात. खोपोली शहरातील कब्रस्तानपासून ते वरच्या खोपोलीपर्यंत असंख्य दुकाने असून या मुख्य बाजारपेठेमधे असलेल्या रस्त्याच्या दुतर्फा जागोजागी अनेक दुकानदारांनी अतिक्रमण केले असल्याचे दिसून येत आहे. मात्र नगर परिषद त्यांच्याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करताना दिसत आहे.



खोपोली शहरात दुकानांच्या बाहेर व रस्त्याच्या कडेला फुटपाथ नाहीत. त्याऐवजी दुकानदारांनी अतिक्रमण केलेले आहे. रस्त्यांच्या दुतर्फा वाहनांना पार्किंगसाठी जागा ठेवण्यात आली आहे. मात्र, त्या ठिकठिकाणी अनेक दुकानदारांनी दुकानात विक्री करण्यात येणारे सामान, दुकानाचे बोर्ड, लोखंडी स्टॅन्ड, हातगाड्या, वडापाव – चहाच्या टपऱ्यांसह पत्र्याचे छप्परे रस्त्यांपर्यंत काढले आहेत. त्यामुळे खोपोलीतमध्ये हॉस्पिटल, रक्त तपासणी केंद्र, औषधे आदी खरेदीसाठी अथवा विविध कामांनी येणारे नागरिक मुख्य बाजारात दुचाकी व चारचाकी घेऊन येत असतात. कामानिमित्त आलेल्या खोपोलीकरांसह बाहेरून आलेल्या ग्रामस्थांपुढे एकच प्रश्न असतो की आपल्या गाड्या कुठे पार्किंग कराव्यात. दुतर्फा पार्किंग करण्यासाठी दिलेल्या जागेत कार व दुचाकीला परवानगी तर आहेच पण पार्किंग करायची तरी कुठे?

दुकानदारांनी आधीच अतिक्रमण करीत रस्त्यांपर्यंत आले आहेत.

.../२

### हिंद टर्मिनल लॉजीस्टिक मधील ६०० कामगारांचा प्रश्न

## आ.महेश बालदी यांच्या पुढाकाराने केंद्रीय उद्योग मंत्री पियुष गोयल यांच्यासोबत दिल्लीत बैठक



**दै.रायगड नगरी । पनवेल**

सीडब्ल्यूसी हिंद टर्मिनल कोणत्याही परिस्थितीत बंद पाडू नका, असे निर्देश केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी सीडब्ल्यूसी लॉजीस्टिक पार्क ( हिंद टर्मिनल )चे डायरेक्टर अमित कुमार यांना दिले आहेत. हिंद टर्मिनल लॉजीस्टिक मधील ६०० कर्मचाऱ्यांवर कोणत्याही परिस्थितीत अन्याय होऊ नये यासाठी केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांच्यासोबत उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांच्या पुढाकाराने दिल्ली येथे गुरुवारी (दि. २१) बैठक पार पडली.

उरण तालुक्यातील भेंडखळ येथे असलेल्या सीडब्ल्यूसी लॉजीस्टिक पार्क (हिंद टर्मिनल ) मधील कामगारांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टिकोनातून केंद्रीय मंत्री पियुष गोयल, सीडब्ल्यूसी लॉजीस्टिक पार्क (हिंद टर्मिनल) चे डायरेक्टर अमित कुमार यांची बैठक घडवून देत ६०० कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे आमदार महेश बालदी यांनी अधोरेखित केले. एवढ्या कामगारांच्या रोजी रोटीचा अत्यंत गंभीर प्रश्न निर्माण होईल हा विषय आमदार महेश बालदी यांनी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले. या वेळी झालेल्या चर्चे नुसार कंपनीचे व्यवस्थापक यांना नामदार पियुष गोयल यांनी कोणत्याही परिस्थितीत ही कंपनी बंद पडून देऊ नका आणि या कामगारांवर उपासमारीची वेळ देऊ नका, अशी सूचना वजा निर्देश दिले.

या बैठकीला मिलिंद पाटील, कृष्णा ठाकूर, लंकेश ठाकूर, अभिजित पाटील आदी उपस्थित होते. आमदार महेश बालदी यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे झालेली हि बैठक कामगारांच्या दृष्टिकोनातून सकारात्मक झाली, त्यामुळे कामगारांना दिलासा मिळाला आहे.

## १२.०६ कोटींच्या कस्टम चोरी प्रकरणी चना व्यापारी रजत सारडाला अटक

**इंदौर : वृत्तसंस्था**

रजत ॲग्रो कमोडिटी प्रायव्हेट लिमिटेड रजतचे वडील गोपालदास सारडा यांना कस्टम आयुक्तालय इंदूर आणि मुंबईच्या पथकाने अटक केली. विशेष गुप्तचर आणि अन्वेषण शाखेच्या (निर्यात) छाननीने चण्याच्या आयात आणि निर्यातीत १२.०६ कोटी रुपयांची करचोरी झाल्याची पुष्टी केली आहे. रजतविरुद्ध मुंबईतही तडाखाची नोंद आहे, त्यामुळे त्याला मुंबईत नेण्यासाठी न्यायालयाने तीन दिवसांचा ट्रान्झिट रिमांड दिला आहे. रजत सारडा यांना इंदूरचे मुख्य न्यायदंडाधिकारी लोकेंद्र सिंह यांच्यासमोर हजर करण्यात आले. कस्टम विभागातर्फे वकील चंदन आरोन न्यायालयात हजर झाले. त्यांनी न्यायालयाला सांगितले की, सीमाशुल्क विभागाच्या विशेष गुप्तचर आणि अन्वेषण शाखेचे (निर्यात) अधीक्षक बिगन कुमार यांच्या वतीने सारडा यांच्याविरुद्ध सीमा शुल्क कायद्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



या प्रकरणाची डायरी इंदूर विभागाकडे सुपूर्द करण्यात आली. ३१ जानेवारी २०२० रोजी डायरीच्या पुरेशा पुराव्याच्या आधारे आणि कलम १०८ मधील रेकॉर्ड कबुलीजबाबाच्या आधारे सारडा यांना अटक करण्यात आली. काबुली हरभऱ्याच्या आयात–निर्यातीत कर चुकवल्याचे रजतने मान्य केले. मात्र, न्यायालयात हजर करण्यापूर्वी सारडा यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. रजतला इंदूरपासून ६०० किमी दूर असलेली मुंबई सादर करायची आहे. त्यामुळे न्यायालयाने २१ एप्रिलपर्यंत ट्रान्झिट रिमांड मागितला. जी कोर्टाने मान्य करून ट्रान्झिट रिमांड मंजूर केला. इंदूरच्या काबुली चना निर्यातदाराने प्रक्रियेच्या नावाखाली रशियन चना कसा आयात केला आणि त्याच्या जागी हलका दर्जाचा चना कसा निर्यात केला. याप्रकरणी ईडी आणि परदेशी व्यापार विभागाकडे तक्रार करण्यात आली होती. जानेवारी २०२० मध्ये, मुंबई कस्टम विभागाचे पथक या प्रकरणात इंदूरला पोहोचले आणि रजत सारडा यांच्या रजत एंटरप्रायजेससह सुमारे दहा कंपन्यांवर छापा टाकून कारवाई केली. रजत सारडा विरुद्ध २३ जानेवारी २०२० रोजी झडती घेण्यात आली. ३१ जानेवारी रोजी जबाब नोंदवण्यात आले. फेब्रुवारीमध्ये पहिले समन्स बजावण्यात आलेला रजत हजर झाला नाही. यानंतर २ मार्च २०२२ पर्यंत १४ समन्स बजावण्यात आले, ज्यामध्ये रजतने हजर राहणे योग्य मानले नाही, म्हणून रजतला प्रथम मुंबई विंगच्या सहकार्याने कस्टम आयुक्तालय इंदूर येथे बोलावण्यात आले आणि नंतर अटक करण्यात आली.

### जिल्हा प्रशासन लागले मान्सून पूर्वतयारीला

## जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी घेतला आपत्ती व्यवस्थापनाचा आढावा



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

आजची ही आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा मान्सून पूर्व तयारीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे. मागील काही काळात घडलेल्या नैसर्गिक आपत्तींचा अभ्यास करावा आणि मनुष्य व संपत्तीच्या झिरो लॉस चा संकल्प करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी आज येथे केले.

मान्सून–२०२२ पूर्वतयारी आढावा बैठक व आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हा नियोजन भवन येथे संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, अपर जिल्हाधिकारी श्री.अमोल यादव, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, विविध शासकीय कार्यालयांचे

.../२

# मुरुड मधील महाआरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्ताने संपूर्ण रायगड जिल्ह्यात भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून मुरुड मध्ये ग्रामीण रुग्णालयात (लेडिकुलसूम बेगम) आयोजित महाशिबिराला शहर तालुक्यासह आजुबाजूच्या परिसरातील लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला !

केंद्र सरकारच्या सुचनेनुसार भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या भव्य महाआरोग्य शिबिराचे उद्घाटन तहसील कार्यालयाचे महसूल नायब तहसीलदार गोविंद कोटंबे मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून सरस्वती प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले.

यावेळी मुरुड नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा स्नेहा पाटील,माजी विरोधी पक्षनेते मंगेश दांडेकर, तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुभाष वाणी, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.विक्रमजीत पडोळे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.संजीव दुबे, जिल्हा रुग्णालय अलिबाग येथील बालरोग तज्ज्ञ डॉ.महालिंग क्षिरसागर,कान, नाक घसा तज्ञ डॉ.समीर पोटे, नेत्रतज्ञ डॉ.सचीन गोमसाळे, फिजिशियन डॉ.विक्रमजित पडोळे, डॉ.विकासिनी चव्हाण, मुरुडचे स्त्री रोगतज्ञ डॉ.मंगेश पाटील, सहाय्यक अधीक्षक नामदेव राहिरे, संजीवनी आरोग्य सेवा संस्था चे कार्याध्यक्ष विजय सुर्वे यासह तालुक्यातील सर्व वैद्यकीय अधिकारी व समुदाय आरोग्य अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आशा सेविका,नांदगावच्या नूतन नर्सिंग स्कूलच्या विद्यार्थी -विद्यार्थीनी, तालुका क्षयरोग पथकातील संकेत घरत, विशाल माळी, कुष्ठरोग तंत्रज्ञ दत्तात्रेय गोंजी, ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ.विजय हडबे, डॉ.अमित मोरे यांच्यासह ग्रामीण रुग्णालयातील व तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ.विक्रमजित पडोळे यांनी आझादीका अमृत महोत्सव निमित्ताने आयोजित भव्य महाआरोग्य शिबिराबाबत आपल्या मनोगतात माहिती दिली. या शिबिरामध्ये तज्ञ डॉक्टरांकडून उपस्थित लोकांची कान नाक घसा, लहान मुलांचे आजार, किडनी विकार, हृदयरोग, पोटाचे विकार, डोळ्यांचे विकार, त्वचारोग, दंतरोग विकार, मुतखडा, स्त्रीयांचे आजार,हाडांचे आजार इ.आरोग्य तपासणी करण्यात येऊन रुग्णांना मोफत औषधे व आरोग्य कार्ड देण्यात आली. दुपारी दोन वाजेपर्यंत शिबिराचा मुरुड शहरासह तालुक्यातील आजुबाजूच्या परिसरातील दोनशेहून अधिकजणांनी लाभ घेतला. सुत्रसंचालन विजय सुर्वे, विठ्ठल शिंदे यांनी केले.सुहास सानप, ओमकार कोरमवार,अधिपरिचारिका निर्मला भोसले,क्ष तंत्रज्ञ श्रुतिका कांबळे,सचीन जाधव, बालाजी घाटे, दिपेश गुरव, दक्षता गुरव आदीं. नी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## उलवे येथे जागतिक वसुंधरा दिनानिमित्त वृक्षारोपण

**दै.रायगड नगरी । उरण**

अमेरिकेतील सॅन फ्रॅन्सिस्को गेलार्ड नेल्सन यांनी १९७० मधे अर्थ डे ही सर्वप्रथम संकल्पना मांडली. त्यानुसार २२ एप्रिल हा दिन जागतिक वसुंधरा दिन म्हणुन जगभर साजरा होत असतो. उलवे येथील वटवृक्ष सामाजिक संस्थेच्या वतीने स्थानिक परिसंस्थेला उपयुक्त असणाऱ्या देशी वृक्ष लागवड करुन जागतिक वसुंधरा दिन साजरा करण्यात आला.

वसुंधरेच्या संरक्षणासाठी कटीबद्ध राहण्याची हीच खरी वेळ आणि अंतिम संधी आहे. त्यामुळे सर्वांनी वाढत्या ग्लोबल वार्मिंगचा विचार करुन आपल्या भावी पिढीसाठी किमान एक व्यक्ती एक झाड लावुन या वसुंधरेला हरित करण्याचा संकल्प करावे असे मत यावेळी संस्थेचे अध्यक्ष किरण मढवी यांनी व्यक्त केले. तसेच संस्थेचे कार्यकर्ते वृक्षमित्र सचिन पाटील यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधुन आजच्या ह्या शुभदिनी राष्ट्रीय वृक्ष वड आणि राज्य वृक्ष आंब्याचे रोपन केले. त्याबद्दल संस्थेमार्फत त्यांना निसर्गमित्र सन्मानपत्र देवुन त्यांना सन्मानीत करण्यात आले. यावेळी वटवृक्ष सामाजिक संस्थेचे अध्यक्ष किरण मढवी, पोलीस अधिकारी सचिन बोठे, मनोहर चवरकर, वसंताताई राजगोपालन, जयप्रकाश मंडल, गणेश मढवी, सचिन पाटील, अमोल कदम, हितेश शिंगरे, वेदांत पाठक, शांताराम ठाकूर, आदी वृक्षमित्र,पर्यावरण प्रेमी उपस्थित होते.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस गंगा गणेश सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पालीदेवद, सुकापूर यांचेतर्फे या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

आमचे सोसायटीमधील खालील वर्णन केलेला फ्लॅट हा **कै.सुमित नरेंद्र गायकर, अमित नरेंद्र गायकर व निर्मला नरेंद्र गायकर** यांचे नावे असून त्यांना आमचे सोसायटी शेअर सर्टीफिकेट **शेअर नं.९११ ते ९२०** हे देण्यात आलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**फ्लॅट नं.ई-४०१, गंगा गणेश सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., गट नं.४/१/१, पालीदेवद, सुकापूर, ता.पनवेल, जि.रायगड**

तरी वरील मिळकतीचे कायदेशीर मालकापैकी **श्री.सुमित नरेंद्र गायकर,** दि.०७/११/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. सबब त्यांचे वर उल्लेखित फ्लॅटचे शेअर सर्टीफिकेट वर **श्री.सुमित नरेंद्र गायकर** हे मयत झाले असल्यामुळे त्यांचे नावाचे जागी त्यांची पत्नी **श्रीमती.स्वरुपा सुमित गायकर** यांनी त्यांचे नाव लावणेकरिता आमचे सोसायटीकडे अर्ज दिलेला आहे.

तरी सदर वर उल्लेखित मिळकतीचे अनुषंगाने शेअर सर्टीफिकेटवर **श्रीमती.स्वरुपा सुमित गायकर** यांचे एकट्याचे नाव लावणेस कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अगर काही सांगावयाचे असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध होताच ८ दिवसांचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे वा समक्ष येवून भेटावे. वरील उल्लेखित मुदतीमध्ये कोणाकडूनही लेखी तक्रार अथवा हरकती आल्या नाही तर सदर मिळकतीबाबत मुदतीमध्ये कोणाकडूनही लेखी तक्रार अथवा हरकती आल्या नाही तर सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही हक्क, हितसंबंध नाही असे गृहीत धरुन आम्ही सदरहू अर्जाचे अनुषंगाने सोसायटीचे मिटींगमध्ये ठराव करून त्याप्रमाणे सदरहू अर्जावर कार्यवाही करतील याची तमाम जनतेने नोंद घ्यावी. सदरहू मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२२/०४/२०२२

**सही/-**
**अध्यक्ष/सेक्रेटरी**
**गंगा गणेश को.ऑप.हौसिंग सो.लि.**
**गट नं.४, हिस्सा नं.१/१, पालीदेवद, सुकापूर, पनवेल**


## रक्तदान शिबीर व मोफत आरोग्य तपासणी तसेच नाडी परीक्षण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग दिंडोरी प्रणित शाखा पनवेल तर्फे हनुमान मंदिर, पोदी नं. ३, सेक्टर-१६ , नवीन पनवेल येथे श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त अखंड नाम जप यज्ञ सप्ताह सोहळ्याचे आयोजन २२ एप्रिल ते २८ एप्रिल या काळात केले आहे.

या काळात श्री गुरूचरित्र, भागवत, नवनाथ या ग्रंथाचे पारायण, प्रहर सेवा, नित्य विशेष याग, त्रिकाळ आरती तसेच विविध आध्यात्मिक सेवा पार पडतील.

तसेच दिंडोरी प्रणित मार्गाच्या २०% अध्यात्म आणि ८०% समाजकारण यानुसार २४ एप्रिल रोजी रक्तदान शिबीर तसेच मंगळवार २६ एप्रिल रोजी सद्गुरू मोरेदादा चॅरिटेबल हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल ट्रस्ट, त्र्यंबकेश्वर अंतर्गत मोफत आरोग्य तपासणी तसेच नाडी परीक्षण आणि सर्व रोग निदान शिबीर सकाळी १० ते रात्री ८ या काळात आयोजित केले आहे. तरी सर्व नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## खारघरमधील चौकात सीसीटीव्ही कॅमेरे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर वसाहती मधील चौकात सीसीटीव्ही बसवण्यात आल्याने त्या भागात होणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या गुन्हेगारीस आळा बसणार असल्याने नागरीकांनी समाधान व्यक्त केले आहे. खारघर सेक्टर १५ घरकूल, गुडविल सोसायटीकडून डी मार्टकडे जाणाऱ्या रस्त्यावर सिडकोने सीसीटीव्ही लावले आहेत. घरकूलकडून खारघर गावाकडे आणि डी मार्टकडून कोपरगावकडे जाणाऱ्या रस्त्यावर चारही बाजूने वाहने येतात. त्यामुळे वाहतूक कोंडी तसेच किरकोळ अपघाताच्या घटना घडतात. परिसरातील सोनसाखळी चोरीच्या घटनाही वाढल्याने चौकात सिडकोने सीसीटीव्ही लावावेत, अशी मागणी परिसरातील रहिवाशांकडून करण्यात आली होती.त्यानुसार हे सीसीटीव्ही बसवण्यात आल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.


**अर्जदारातर्फे वकील**
**अवंतिका भ. देशेकर**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो.कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.४९०/२०२२
नि.क्र.८/ड
ने.ता.१८/०६/२०२२

**श्रीमती.वंदना हनुमंत शेडगे व इतर २**
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.फ्लॅट नं.अे/३०२, श्री अंबिका हेरिटेज,
प्लॉट नं.१, खारघर रेल्वे स्टेशन जवळ, सेक्टर नं.१,
खारघर, रायगड महाराष्ट्र ४१०२१० — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, **कै.हनुमंत पांडुरंग शेडगे** हे दि.०६/०५/२०२१ रोजी मु.पोस्ट साप, तालुका : कोरेगाव, जिल्हा : सातारा येथे मृत्यू पावले आहेत. मयत **कै.हनुमंत पांडुरंग शेडगे** यांचे मृत्यूसमयी ता.पनवेल येथे खालील वर्णनाच्या सदनिका / फ्लॅटस आहेत.

मयत **कै.हनुमंत पांडुरंग शेडगे** यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे असलेल्या खालील वर्णनाच्या सदनिका / फ्लॅट अहेत.

**सदनिका क्र.१ (फ्लॅटचे वर्णन)**
**रुम नं.३०२, तिसरा मजला, ए विंग, श्री अंबिका हेरिटेज बिल्डींग, प्लॉट नं.०१, सेक्टर ०१, खारघर ४१०२१०**
**गाळ्याचे वर्णन (शॉपचे वर्णन)**
**गुरुकृपा अपार्टमेंट, ग्राऊंड फ्लोअर, शॉप नं.३, प्लॉट नं.१७, (क्षेत्रफळ ३७५ स्क्वेअर फिट) सेक्टर ९, कामोठे**

अर्जदार क्र.१ ते ३ हे वरील मिळकतीसंदर्भात मयतांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या मिळकतीच्या अर्जदार क्र.१ ते ३ हे एकमेव वारस असल्यामुळे या वारस हक्कासंबंधी कोणीही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत स्वतःच्या अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष वकीलामार्फत हजर राहून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये मुदतीत हरकती न आल्यास मे.कोर्ट अर्जदारांच्या लाभांत पुरावा घेण्याची कारवाई करेल व अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत **कै.हनुमंत पांडुरंग शेडगे** यांचे कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला मंजूर करेल.

आज दि.२१ एप्रिल २०२२ रोजी व माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



**अर्जदारातर्फे वकील**
**ॲड.विजया शिंदे**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.५२७/२०२२
नि.क्र.८/ड
ने.ता.०८/०६/२०२२

**कै.प्रकाश मारुती भोईर यांचे (मयत) यांचे कायदेशीर वारस**
**१) श्रीमती.रेखा प्रकाश भोईर**
वय : ४० वर्षे,
रा.घर नं.४४७-अ, मराठी शाळेजवळ, सेक्टर-१४,
कामोठे गाव, पनवेल, रायगड-४१०२०६
**२) कु.नीरज प्रकाश भोईर**
वय : २० वर्षे
रा.घर नं.४४७-अ, मराठी शाळेजवळ, सेक्टर-१४,
कामोठे गाव, पनवेल, रायगड-४१०२०६
**३) कु.नेहा प्रकाश भोईर**
वय : १८ वर्षे
रा.घर नं.४४७-अ, मराठी शाळेजवळ, सेक्टर-१४,
कामोठे गाव, पनवेल, रायगड-४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

१) या जाहीर नोटीसीने सर्व जनतेस कळविण्यात येते की, **कै.प्रकाश मारुती भोईर (मयत)** यांचे वारस अर्जदार **श्रीमती.रेखा प्रकाश भोईर** ह्या पत्नी आहेत. **कु.नीरज प्रकाश भोईर** हा मुलगा आणि **कु.नेहा प्रकाश भोईर** ही मुलगी आहे. त्याच्याशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. **कु.नेहा प्रकाश भोईर** यांचा मृत्यू दि.०१/०४/२०२० रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे येथे झालेला आहे.

**कै.प्रकाश मारुती भोईर यांच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-**

**अ) मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सिडको लि. व महानगरपालिका पनवेल यांचे हद्दीतील भूखंड क्र.१०४-ए, सेक्टर क्र.१४, या मिळकतीवर बांधण्यात आलेली इमारत नीलकंठ हाईटस मधील निवासी सदनिका क्र.३०१, तिसरा मजला, क्षेत्रफळ ३२.९९ चौ.मी. कारपेट एरिया ही सदनिका मिळकत.**

**आ) नवी मुंबई १२.५% योजने अंतर्गत मौजे : कामोठे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, विभाग क्र.१७, भूखंड क्र.३२ चा सीमांकन नकाशा संदर्भ : सह. भूमी व भूमापन अधिकारी (१)(२)(३) क्र. सिडको/भूमी/१६९/१२.५% योजना, क्षेत्रफळ २२२.२५ चौ.मी. ही सदनिका मिळकत.**

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून, सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळण्याकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. वरील अर्ज शिवाय कोणीही या मिळकतीचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारस दाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत त्याची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न केल्यास कोणीही ही हरकत नाही असे गृहीत धरुन कोर्ट अर्जदारास वारस दाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२२ एप्रिल २०२२ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



# ग्रामपंचायत विचुंबे

**ता.पनवेल, जि.रायगड**

## जाहीर सूचना २०२२/२३

दि.२३/०४/२०२२

ग्रामपंचायत विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड हे ग्रामपंचायत विचुंबे हद्दीतील ग्रामनिधी, पाणी पुरवठा व १५ वा वित्त आयोगांतर्गत पुढील विकासकामे / साहित्य यांची अंमलबजावणी करिता सिलबंद निविदा / कोटेशन मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम १% | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | सागर म्हात्रे घर ते शशिकांत म्हात्रे घरापर्यंत आर.सी.सी. रस्ता तयार करणे. (ग्रामनिधी) | १०,००,०००/- | १०,०००/- | २३/०४/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | ०२/०५/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| २ | सभा मंडपच्या संपूर्ण आवारात कंपाऊंड बांधणे. (ग्रामनिधी) | १०,००,०००/- | १०,०००/- | २३/०४/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | ०२/०५/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| ३ | ज्ञानेश्वर माऊली सोसायटीकडे जाणारा रस्ता डांबर खडीने दुरुस्त करणे. (ग्रामनिधी) | ३,७३,१६०/- | ३,७३१/- | २३/०४/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | ०२/०५/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| ४ | ज्ञानेश्वर माऊली सोसायटीकडे जाणारा रस्ता डांबर खडीने दुरुस्त करणे. (ग्रामनिधी) | ३,७०,४००/- | ३,७०४/- | २३/०४/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | ०२/०५/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| ५ | क्रिस्टल पार्क सोसायटी ते बन्शीधर भोईर यांचे घरापर्यंत ६'' इंच व्यासाचे पाणीपुरवठा पाईप लाईन टाकणे. (पाणी पुरवठा) | ११,९९,३३९/- | ११,९९३/- | २३/०४/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | ०२/०५/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| ६ | मुख्य पाणी पुरवठा पाईपलाईन ग्रामपंचायत विचुंबे करिता स्वतंत्र करणे (मुख्य उद्भव ते इ.एस.आर गेट) (पाणी पुरवठा) | ११,७८,४५१/- | ११,७८४/- | २३/०४/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | ०२/०५/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| ७ | विचुंबे सुपर मार्केट ते गंगा रेजेन्सी सोसायटी पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. (१५ वा वित्त आयोग) | १०,००,०००/- | १०,०००/- | २३/०४/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | ०२/०५/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |

**अटी व शर्ती**

१) निविदा मिळणेकरिता दि.२३/०४/२०२२ ते ०२/०५/२०२२ पर्यंत लेखी अर्ज सादर करणे.
२) अर्जदारांना सदर कोरे निविदा प्रपत्र दि.२३/०४/२०२२ ते ०२/०५/२०२२ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळता) ग्रामपंचायत कार्यालयात दुपारी ०३:०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.
३) भरलेल्या सिलबंद निविदा दि.२३/०४/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी ११:०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.
४) आलेल्या निविदा दि.०२/०५/२०२२ रोजी दुपारी १२:०० वाजता समक्ष उघडण्यात येतील.
५) इसारा रक्कम डिमांड ड्राफ्टने स्वीकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट सरपंच ग्रामपंचायत विचुंबे यांचे नावे असावा, अथवा रोखीने.
६) मंजूर ठेकेदारास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
७) सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल व अंदाजपत्रक मिळणे कामी विनंती अर्ज केल्यावर व १०० रु. भरणा केल्यानंतर मिळेल.
८) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
९) निविदा किंमत ना परतावा राहील.
१०) नियमाप्रमाणे आयकर भरावा लागेल.
११) अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केला जाईल.
१२) कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, २.३३% आयकर, १% कर्मचारी विमा, ०.१५% सर चार्ज रकमा प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
१३) कामाच्या आदेशाप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस जबाबदार रहावे लागेल.
१४) झालेल्या तांत्रिक मुल्यांकना प्रमाणे व निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.
१५) निविदा मंजूर केल्यास ४ दिवसांत काम सुरू करणे बंधनकारक आहे.
१६) मंजूर काम पनवेल पंचायत समिती बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार व पंचायत देखरेखीखाली करायचे आहे.
१७) निविदा मंजूर केल्यावर रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देवून करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा.
१८) सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.
१९) काम पूर्ण करणे पूर्वीच्या कामाचे ठिकाणाचे फोटो व काम चालू असतानाचे फोटो आणि काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अंतिम बिले दिली जाणार नाहीत.
२०) सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे काम करण्याचे आहे.
२१) एक किंवा सर्व निविदा / कोटेशन नामंजूर करण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.

**सही/-**
**श्री.सुहास विष्णू वारे**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत विचुंबे,**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**सौ.नम्रता आकाश पाटील**
**सरपंच**
**ग्रामपंचायत विचुंबे,**
**ता.पनवेल, जि.रायगड**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## खोपोली शहरात पार्किंगची समस्या गंभीर ; रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दुकानदारांचे अतिक्रमण

पट्ट्याच्या आत गाडी लावली तर दुकानदार आवाज देतात आणि सांगतो की माझ्या दुकानासमोर गाडी उभी करू नकोस, तुला जिथे पार्किंग करायची असेल तिथे उभी कर, त्यांनतर भांडणही करायला कमी करीत नाही. रस्त्यांवर वाहने उभी केल्यास पोलिसांना 'नो पार्किंग'चा दंड भरावा लागत असल्याने वाहन पार्किंग करायची तरी कुठे असा प्रश्न वाहन चालकांमधून उपस्थित केला जात आहे. या विषयांवर खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी अनुप दुरे यांच्याशी दूरध्वनींवरून सपर्क केला असता ते म्हणाले की, अतिक्रमण करणाऱ्या दुकानदारांवर नक्कीच कारवाई करण्यात येईल, पण वाहने 'नो पार्किंग' वर दंड वसुली ही पोलिसांकडे आहे, नगर परिषदेकडे नाही. ज्या दुकानदराने अतिक्रमण केले आहे ते हटविण्यासाठी मी टीम पाठवत आहे, पण तुम्ही सांगा कोणत्या दुकानदाराने अतिक्रमण केले आहे, असेही मुख्याधिकारी म्हणाले. पत्रकारांना अतिक्रमण विचारले जात आहे, शहरात झालेले अतिक्रमण नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांना दिसत नाहीच का ?

खोपोली नगरपरिषदेच्या दुर्लक्षपणामुळे संपूर्ण खोपोली शहरात अतिक्रमणाला ऊत आल्याचे चित्र दिसून येत आहे. रस्त्यावर वाहने उभी केल्यास पोलिसांकडून दंडात्मक कारवाई करण्यात येते, मात्र याच पोलिसांना दुकानदाराने केलेले अतिक्रमण दिसत नाही का?खोपोली शहरातील ठीकठिकाणे झालेले अतिक्रमण हटविण्यासाठी नगर परिषद कार्यालयासमोर पत्रकारांसह अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी आमरण उपोषण केले. मात्र, नगर परिषदेने त्यांना फक्त आश्वासन दिले. पण खोपोली शहरात अतिक्रमण कमी न होता वाढत असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे. खोपोलीतील पार्किंगची समस्या सुटणार तरी कधी?प्रशासनाला जाग येणार तरी कधी? अतिक्रमण हटणार तरी कधी? मुख्याधिकारी लक्ष का देत नाही? असा संतप्त सवाल खोपोलीकरांकडून विचारला जात आहे.

## जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी घेतला आपत्ती व्यवस्थापनाचा आढावा

कार्यालयप्रमुख, यशदाचे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण केंद्राचे संचालक कर्नल सुपणेकर, कोस्ट गार्डच्या चांदनी चॅटर्जी, एनडीआरएफ चे डी.महेशकुमार, जीएसआय चे सैकत रॉय उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर पुढे म्हणाले की, सर्व विभागांचे आपत्ती व्यवस्थापन आराखडे आणि संपर्क क्रमांक हे अद्यावत करावेत. नियंत्रण कक्ष सुरू करावेत व ते २४÷७ कार्यरत राहतील याची दक्षता घ्यावी. कोणत्याही आपत्कालीन प्रसंगी संबंधित विभागाने साधन-सामुग्री व मनुष्यबळासह तात्काळ प्रतिसाद द्यावा. विभागाकडील आपत्कालीन परिस्थितीमध्ये आवश्यक असलेले साधन सामुग्री/साहित्य व्यवस्थित कार्यरत ठेवावेत. साहित्य वापरणाऱ्या व्यक्तींचे संपर्क क्रमांक नियंत्रण कक्षात ठेवाव्यात. पर्जन्यमान, समुद्राची भरती व धरणातील विसर्ग या परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून पूरग्रस्त भागातील नागरिकांचे सुरक्षित ठिकाणी वेळेत स्थलांतर करावे. पूर व दरड कोसळण्यास अतिवृष्टी कारणीभूत असल्याने पर्जन्यमापकद्वारे प्राप्त माहिती ग्रामस्थांपर्यंत पोहोचवावी.

ते पुढे म्हणाले की, गावपातळीवर युवकांचे गट स्थापन करून त्यांना प्रशिक्षण द्यावे, पर्जन्यमानाच्या आकडेवारीवर लक्ष ठेवावे. जेणेकरून पूरप्रवण व दरड प्रवण भागातील नागरिकांचे सुरक्षित ठिकाणी वेळेत स्थलांतर करणे शक्य होईल. तसेच उपविभागीय अधिकारी व तहसिलदार इन्सिडेंट कमांडर असल्याने त्यांना सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन नैसर्गिक आपत्तीत तात्काळ मदत करावी. सर्व साहित्य सुरक्षित असल्याची खात्री करावी. प्रत्येक महत्वाच्या बाबींसाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. बोट, लाईफ जॅकेट, स्पीड बोट, जनरेटरसह जेसीबी, रुग्णवाहिका, पोकलेन, टँकर, वूडकटर व मनुष्यबळ इत्यादी आपत्कालीन साहित्य तात्काळ उपलब्ध होईल, याचे नियोजन करावे. सर्व अधिकाऱ्यांनी मुख्यालयात उपस्थित राहावे. मागील घडलेल्या घटनांमध्ये आलेल्या अनुभवाच्या आधारे त्यापेक्षा अधिक पूर्वतयारी राहील याचे काटेकोर नियोजन करावे.

कोणत्याही गोष्टीसाठी प्रशिक्षण महत्वाचे असल्याचे सांगून प्रत्येक गावात युवकांचे पथक तयार करावे. त्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे व बचावकार्याचे प्रशिक्षण द्यावे. नैसर्गिक आपत्तीत काम करण्याविषयीची मार्गदर्शक तत्वे सर्वांना समजावून सांगावीत. ही मार्गदर्शक तत्वे दर्शनीय भागात सर्वत्र प्रदर्शित करावीत. प्रत्येक लहानसहान बाबींसाठी मॉक ड्रील आयोजित करावे. सातत्याने एकमेकांच्या संपर्कात राहावे. शाळा किंवा तत्सम निवारागृहे सुस्थितीत असल्याची खात्री करून घ्यावी, असे ते म्हणाले.

यावेळी उपस्थितांना कर्नल सुपणेकर यांनी इन्सिडन्ट रिस्पॉन्स सिस्टम या विषयावर आणि जीएसआय चे सैकत रॉय यांनी पर्जन्यदृष्टी व दरडप्रवण क्षेत्र याविषयी संगणकीय सादरीकरणाद्वारे विस्तृत माहिती दिली. तसेच अपर जिल्हाधिकारी अमोल यादव यांनीही तळीये, साखर सुतारवाडी, केवनाळे व महाडचा पूर या दुर्घटनांमधून काय शिकलो आणि आता नैसर्गिक आपत्तींशी मुकाबला करताना सर्व तयारीनीशी कशाप्रकारे तत्पर राहावे, याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यशाळेच्या निमित्ताने एनडीआरएफ व कोस्ट गार्डच्या उपस्थित अधिकाऱ्यांनीही नैसर्गिक आपत्तीत करावयाच्या कार्यवाहीविषयी उपस्थित अधिकाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## चंद्रकांत चौधरी यांनी जपलीय सामाजिक बांधिलकी



**दै.रायगड नगरी । माथेरान**

हिंदू मुस्लिम धर्मियांच्या एकोप्याचे दर्शन माथेरान मध्ये नेहमीच पहावयास मिळते. मुस्लीम बांधवांच्या कोणत्याही सणाला येथील सर्व हिंदु धर्मीय सहभागी होऊन एकोप्याने आणि आनंदाने सण साजरे करतात. त्यातच आता मुस्लिम समाजाचा पवित्र महिना रमजान निमित्त शिवसेना शाखा माथेरान यांच्या वतीने माथेरान शिवसेना शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी , यांच्या प्रमुख उपस्थितीत मुस्लिम मोहल्ला तसेच माथेरान मधील इतर प्रभागातील सर्व मुस्लिम बांधवांना इफ्तार पार्टी म्हणून फळांचे वाटप केले याप्रसंगी मीरा फौंडेशनच्या रेखा चौधरी , महिला आघाडीच्या सर्व सन्माननीय सदस्या, मुस्लिम मोहल्ला शिवसेना विभागाचे अनिस शेख, खालिद शेख, आलम मुजावर ,अली डॉगरे , तन्वीर मुजावर, सिकंदर मुजावर, व बहुसंख्य शिवसैनिक, तसेच युवासैनिकेचे अनिकेत जाधव,निखिल शिंदे,प्रसिद्धी प्रमुख अमोल चौगुले,शैलेश वाघेला,दर्शन घाग,तसेच महिला आघाडी उपस्थित होते. या प्रसंगी शिवसेना शाखेच्या वतीने समस्त मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.

## पनवेलमध्ये शिवसेनेकडून प्रभाग १४ येथे दावत -ए -इफ्तार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शिवसेनेच्या वतीने प्रभाग क्रमांक १४ प्रेस्टिज गार्डन सोसायटी, येथे दावत–ए–इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.

शिवसेनेचे पनवेल उपशहर प्रमुख अबरार मास्टर–कच्छी, प्रभाग क्रमांक १४ चे उपविभाग संघटक जुनैद पवार, शाखाप्रमुख नुरूल्ला वाईकर ,यांच्या पुढाकाराने या पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खास पाहुणे म्हणून मौलाना शाह अब्दुल गणी व शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत, शिवसेना पनवेल तालुका संघटक भरत पाटील, पनवेल विधानसभा संघटक दिपक निकम, पनवेल महानगर प्रमुख रामदास शेवाळे, पनवेल महानगर संघटक ॲड. प्रथमेश सोमण, उपमहानगरप्रमुख दीपक घरत, जमील खान, इम्तियाज शेख, पनवेल शहर प्रमुख प्रवीण जाधव यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

## मोटारसायकलीची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल उड्डाणपुलाजवळ उभी करून ठेवलेली मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे.

आकुर्ली येथे राहणार ए.ए.राठोड याने त्याची मोटरसायकल नवीन पनवेल पुलाजवळ उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# माथेरानच्या एमजी रोड वर ड्रेनेजचे पाईप टाकल्या नंतरच क्ले ब्लॉकचे काम करावे : मनोज खेडकर

**दै.रायगड नगरी । माथेरान**

एम एम आर डी ए सध्या माथेरान च्या रस्त्यावर क्लेय ब्लॉक लावण्याचे काम करीत आहे रुपये पन्नास कोटी एम एम आर डी ए माध्यमातून रस्त्यावर संपूर्ण खर्च करीत आहे अमन लॉज ते टपालपेटी नाक्या पर्यंतचे ब्लॉक लावण्याचे काम लवकरच पूर्ण होइल.टपालपेटी ते लक्ष्मी हॉटेल नाका या बाजारपेठेतील प्रमुख रस्त्यावर अनेक अनेक छोटी मोठी हॉटेल्स रेस्टॉरंट आहेत या हॉटेलचे सांडपाणी स्टोर्म वॉटर ड्रेनेजमध्ये सोडले जाते त्यामुळे चेंबर चोक ऑफ होण्याचे प्रमाण वाढते कारण ज्या रेस्टॉरंट हॉटेल वाल्याकडे सेफ्टी टँक बनवण्यासाठी जागा नाही त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरते यातून पर्यावरणाला मोठा धोका निर्माण होऊ शकतो त्यामुळे क्ले ब्लॉकचे काम करण्यापूर्वी माथेरान नगरपालिकेने टपाल पेटी ते लक्ष्मी हॉटेल या प्रमुख एम.जी. रस्त्यावर ड्रेनेजचे पाईपलाईन



टाकण्याची मागणी माथेरान शहर काँग्रेसचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी माथेरान नगरपालिकेच्या उत्तम प्रशासक सुरेखा भणगे यांच्याकडे केली आहे.

यामुळे चेंबर चोकप झाल्यास ते साफ करणे सोपे जाईल अन्यथा बऱ्याच वेळा स्टॉप मोटरचे चेंबर उघडले जाते व काढलेले ब्लॉक पुन्हा व्यवस्थित लावले जात नाहीत त्यामुळे रस्त्याची मोठी हानी होते त्याचप्रमाणे लवकरच पावसाळा सुरू होत असल्याने माथेरानच्या रस्त्यावरील मातीची धूप होऊ नये यासाठी बांध घालण्याची मागणी देखील मनोज खेडकर यांनी प्रशासक यांच्याकडे केली आहे.

माथेरानला पाणीपुरवठा करणाऱ्या शारलोट लेक या तलावाचा गाळ काढण्याचे महत्त्वपूर्ण काम हाती घेत असल्याची माहिती प्रशासक सुरेखा भणगे यांनी यावेळी उपस्थितांना दिले याकरिता नगरपालिकेच्या कामगारांसोबतत गावातील नागरिकांचा देखील सहभाग घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले तसेच निरूपणकर नाना धर्माधिकारी यांच्या अनुयायांची देखील मदत या स्वच्छतेच्या कामात घेणार असल्याचे सुरेखा भनगे यांनी सांगितले याकामी लागणाऱ्या आवश्यक यंत्रसामुग्रीची मदत घेण्यात येणार आहे तलावातून निघणारी माती यातून माथेरानच्या जंगलातील खड्डे भरणार आहे यातून पर्यावरण वाचण्याचे पर्यावरण महत्त्वपूर्ण काम होणार असल्याचे प्रशासकांनी सांगितले मनोज खेडकर यांच्यासह माजी नगरसेवक शिवाजी शिंदे संतोष लखन व सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे यावेळी उपस्थित होते.

# साहेब, पुन्हा लाईट गेली; फोन कोणाला करू

**दै.रायगड नगरी । दिघी**

राज्य भारनियमनातून लवकरच मुक्त होईल अशी घोषणा करण्यात येत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेला मोठा दिलासा मिळत आहे. मात्र, तशी माहिती महावितरणकडून स्पष्ट होत नसल्याने श्रीवर्धन तालुक्यातील नागरिकांच्या डोक्यावर भारनियमनाची टांगती तलवार कायम आहे.

महावितरण विभागाने तात्काळ भरनियमनला पर्याय म्हणून अनेक प्रयत्न सुरू केले आहेत. तसे संकेत ही देण्यात आले. विजेच्या तुडवड्यामुळे इतर राज्यातून वीज खरेदी करणे किंवा खाजगी वीज घेणे असे अनेक पर्यायातून राज्यातील भारनियमन लवकरच मुक्त होईल असे सांगण्यात येत आहे. मात्र, एकूणच राज्यातील कोळश्याच्या तुटवडा किंवा विजेच संकट बघता क्षमतेपेक्षा जास्त विजेची मागणी असल्याने भरनियमनातुन मुक्तता होईल या बद्दल नागरिकांतून साशंकता निर्माण होत आहे. सद्यस्थितीत श्रीवर्धनमध्ये लोडशेडिंगच्या झटक्याने संतापाचा भडका उडाला आहे. तालुक्यामध्ये महावितरण कडून कुठलीही पूर्वसूचना न देता संपूर्ण गावांना वेठीस धरत आहे. ६० ते ८० गाव वाड्यावरील एकाचवेळी विद्युत पुरवठा खंडित होत आहे. वीज वितरण विभागाकडून भारनियमनातुन मुक्तीचा दिलासा मिळत असला तरी दिवसभर उन्हाच्या झळाणी हैराण झालेल्या येथील रहिवाशांची रात्री – अपरात्री लोडशेडिंगमुळे संतापाचा पारा चढला आहे. मात्र, महावितरण कंपनीकडे याची कोणतीही माहिती नसल्याने किंवा भरनियमन मुक्ततेची स्पष्टता होत नसल्याने येथील नागरिक मोठया पेचात अडकला आहे.

संपूर्ण श्रीवर्धन तालुका भरनियमनाच्या संकटात होरपळत आहे. तालुक्यातील प्रत्येक विभागातील दुय्यम अभियंता कार्यालयातील अधिकाऱ्यांना विचारले असता आम्हाला याची माहिती नसल्याचे सांगण्यात येत असल्याने महावितरणाच्या विरोधात संताप व्यक्त करण्यात येत आहे. दिघी, कुडगाव, नानवली, आदगाव, वेळास, वडवली, शिस्ते, दिवे–आगर, बोर्लीपंचतन, भरडखोल, वांजळे, शेखाडी, वाळवटी, श्रीवर्धन, जसवली याठिकाणी २ ते ३ तास तर जांभूळ परिसरात ४ तास भारनियमन सुरू असून संपूर्ण तालुक्यात लोडशेडिंग आहे.

# आभाळ भरून आलं अन् पाऊस बरसला

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यात गुरूवारी सकाळी वातावरण कुंद आणि आभाळ आलेलं होते आणि त्यानंतर साधारणत: साडेनऊ ते सव्वा दहा वाजेपर्यंत पोलादपूर शहरासह तालुक्याच्या विविध भागात पावसाने हजेरी लावली. यानंतर आकाशातील मळभ दूर होऊन लख्ख सुर्यप्रकाश पसरल्यामुळे हवेतील उष्म्यात प्रचंड वाढ होऊन घामाच्या धारा अंगातून निघू लागल्याने नागरिक हैराण झाले.

पोलादपूर तालुक्यात गुरूवारी सकाळी सूर्यदर्शन झाले नाही. आभाळ दाटल्याने सर्वत्र मरगळ जाणवत असतानाच सकाळी साडेनऊ वाजल्यापासून सव्वा दहा वाजेपर्यंत अचानक पाऊसधारा कोसळू लागल्या. यामुळे सृष्टीत हिरवे चैतन्य निर्माण झाले असतानाच आकाशातील मळभ दूर होऊन लख्ख सुर्यप्रकाश पसरून पुन्हा हवेतील गर्मी वाढून तापमान झपाट्याने २९ अंशावरून ४२ अंशापर्यंत पोह–चेले. सकाळी पडलेल्या पावसाच्या पाण्याची या उष्णतेने वाफ होऊन हवेतील उष्म्यात प्रचंड वाढ झाली आणि पोलादपूर शहरासह तालुक्यात सर्वत्र ४१ अंश सेल्सियस तापमान असताना ४६ अंश सेल्सियस तापमानाएवढी उष्णता जाणवू लागली.

रात्रीदेखील तापमानामध्ये वाढ असल्यामुळे अंगाची काहिली वाढली असताना महावितरणने दोन तास विद्युतपुरवठा खंडित ठेऊन जनतेच्या संतापात भर टाकली. पोलादपूर तालुक्यात मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणादरम्यान मोठ्या प्रमाणात महाकाय वृक्षांची कत्तल करून सिमेंटकाँक्रीटचे रस्ते करण्यात आल्यामुळे तापमानवाढ झाली असून उत्तरवाहिनी सावित्री नदीदेखील उथळ आणि कोरडी झाल्यामुळे नदीपात्रातील दगड–गोट्यांनी तापमान वाढविण्यास सहकार्य केल्याचे दिसून येत आहे.



# प्राथ.शाळा देवकान्हे येथे शाळा पूर्वतयारी प्रशिक्षण व मेळावा उत्साहात संपन्न

## विद्यार्थी व पालकांचा लाभला उत्स्फूर्त सहभाग

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

रोहे तालुक्यातील पिंगळसई केंद्र शाळेतंर्गत प्राथ. शाळा देवकान्हे येथे शाळा पूर्वतयारी प्रशिक्षण व मेळावा २१ एप्रिल रोजी उत्साहात संपन्न करण्यात आला.

रोहा.पं.समिती गट शिक्षणाधिकारी सादूराम बांगारे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली व आदर्श सरपंच पुरस्कारप्राप्त सरपंच रायगड भूषण वसंत भोईर यांच्या लाभलेल्या बहुमोल सहकार्याने संपन्न झालेल्या या मेळाव्याप्रसंगी ग्रा. पं.सदस्य दयाराम भोईर, नीलिमा भोईर, रिया भोईर, शा.व्य. समिती अध्यक्ष विश्वनाथ थिटे, उपाध्यक्ष प्रवीण भोईर, सृष्टी सुटे, ऋतुजा भोईर, सुप्रिया जाधव आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. केंद्र पिंगळसई अंतर्गत देवकान्हे रायगड, बाहे व डोंगरचीवाडी आदी तिन्ही शाळांचा एकत्रितपणे शाळापूर्व तयारी मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षात सहभाग घेतला.

या विद्यार्थ्यांचे स्वागत ढोल–ताशा व लेझिम पथकाने तसेच प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. तसेच इयत्ता पहिली दाखल होणारे तिन्ही शाळेतील विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते तसे तिन्ही शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवकान्हे शाळेचे मुख्याध्यापक सचिन टिकुळे सर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी बाहे शाळेचे मुख्याध्यापक तिपुळे, सहशिक्षिका श्रीमती काळे तसेच डोंगरचीवाडी शाळेचे मुख्याध्यापक मदने यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शेवटी विठ्ठल हाके सर यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानून मेळाव्याची यशस्वीरीत्या सांगता करण्यात आली.


अर्जदाराचे वकील : **ॲड.जितेंद्र परशुराम म्हात्रे**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज क्र.४७५/२०२२
नि.क्र.७/ड
ने.ता.२४/०५/२०२२

**श्री.बबन उंदीर दमडे** अर्जदार

विरुद्ध

ग्रामसेवक, ग्रामपंचायत दापोली
ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाले

जनतेस कळविण्यात यते की, अर्जदार **श्री.बबन उंदीर दमडे** यांची आजी **मयत महादीबाई आळु दमडे** ह्यांचा दि.०४/०७/१९८१ या दिवशी गाव भंगारपाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी मृत्यू झालेला आहे आणि अर्जदार यांनी आपल्या आईच्या मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग यांचे न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू श्री.बबन उंदीर दमडे यांची आजी **मयत महादीबाई आळु दमडे** यांचा मृत्यू वर नमूद ठिकाणी झाला आहे किंवा कसे याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कोणाची हरकत असेल तर या जाहीर नोटीशीच्या दिनांकापासून १ (एक) महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या कायदेशीर हरकती नोंदविण्याच्या आहेत. या लेखावरुन असे कळविण्यात येत आहे की, सदरहू मुदतीत योग्य हरकती न आल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार यांचेकडून योग्य तो पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीच्या मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

आज दि.२२/०४/२०२२ या दिवशी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**



**अर्जदारतर्फे वकील**
**कु.प्रगती रा. म्हात्रे**

**जाहीर नोटीस**

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.६९/२०२२
नि.क्र.८/ड
ने.ता.०८/०७/२०२२

**१) श्री.नरेंद्र दत्तात्रेय ठाकूर**
वय : वर्षे, धंदा : नोकरी
**२) श्री.सौरभ नरेंद्र ठाकूर**
वय : वर्षे, धंदा : नोकरी
दोघे रा.कामगार वसाहत, पालवी हॉस्पिटल समोर,
रुम नं.२४, दुसरा मजला, बी विंग,
कामठा रोड, उरण, ता.उरण, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी उरण येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात **कै.कल्पना नरेंद्र ठाकूर** यांचे वारस म्हणून वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केला आहे. **कै.कल्पना नरेंद्र ठाकूर** ह्या दि.०२/१०/२०२१ रोजी रिलायन्स हॉस्पिटल कोपरखैरणे, कोपरखैरणे रेल्वे स्थानकाजवळ, नवी मुंबई येथे मयत झाल्या आहेत. **सौ.कल्पना नरेंद्र ठाकूर** यांच्या नावे असलेल्या मिळकत खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**सदनिका क्र.१०४, जे विंग, पहिला मजला, क्षेत्र ३८५ चौ.फूट, (३५.७८ चौ.मी.) पंचवटी को.ऑ.हौ.सो., कामठा, उरण, ता.उरण, जि.रायगड**

**कै.कल्पना नरेंद्र ठाकूर** यांच्या मृत्यूनंतर त्यांचे नावे कमी करून वर वर्णन केलेल्या मिळकतीवर त्यांचे वारस अर्जदार क्र.**१) श्री.नरेंद्र दत्तात्रेय ठाकूर, २) श्री.सौरभ नरेंद्र ठाकूर** १ व २ सर्व रा.कामगार वसाहत, पालवी हॉस्पिटल समोर, रुम नं.२४, दुसरा मजला, बी विंग कामठा रोड, उरण, ता.उरण, जि.रायगड हेच कायदेशीर वारस आहेत. ह्या वारसांचे नावे रेकॉर्ड वर येणे गरजेचे व आवश्यक झालेले आहे. सबब सदर कारणाकरिता अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायालयात वारसदाखला मिळणेकरिता सदरचा दि.चौ.अर्ज क्र.६९/२०२२ दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर मिळकतीचे वारस हक्काबाबत अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१९ माहे एप्रिल सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, उरण**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, उरण**



**अर्जदारतर्फे वकील**
**ॲड.स्वानंद भा. नवाळे**
**ॲड.स्वप्नील ठाकूर**

**जाहीर नोटीस**

कल्याण येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.८८/२०२२
नि.क्र.५

**श्री.सुनील पहिलाजराय**
**उर्फ पहिलाज वाधवाणी, वगैरे** अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाले

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे : नेरे, ता.पनवेल, जि.रायगड, मौजे : कशेळी, ता.भिवंडी, जि.ठाणे व मौजे : उल्हासनगर, ठाणे येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतींचे वर्णन**

**१) मौजे : नेरे, ता.पनवेल, जि.रायगड**

| अनु क्र. | मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १ अ | नेरे | १ | ३ | ३–५८–०० | ३५.८० |
| १ ब | नेरे | १ | ४ | ३–८४–०० | ३८.४० |

२) मौजे : कशेळी, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील सर्व्हे नं.१८७, या जागेवरील ''चामुंडा कॉम्प्लेक्स'' मधील आर.सी.सी. गोडावून नं.डी–९ चे क्षेत्र ३७२० चौ.फूट (३४५.७२ चौ.मी. बांधीव क्षेत्र व त्याखालील जमीन)

३) मौजे : उल्हासनगर, दुकान नं.७७ च्या मागे यु.नं.९८ चा अविभाजित ५० टक्के प्रमाणे अर्धा हिस्सा, शीट नं.१३, रोड सपना कॉम्प्लेक्स मागे, उल्हासनगर–४, एकूण क्षेत्र १८०.५६ चौ.मी. इतक्या क्षेत्रापैकी ५० टक्के क्षेत्र ९०.२८ चौ.मी.

कै.पहिलाजराय उर्फ पहिलाज वाधवाणी, हे दि.०५/०७/२०१६ रोजी, ठाणे येथे मयत पावले असून, त्यांना अर्जदार क्र.**१) श्री.सुनील पहिलाजराय उर्फ पहिलाज वाधवाणी, अर्जदार क्र.२) श्रीमती.राणी पहिलाजराय उर्फ पहिलाज वाधवाणी, अर्जदार क्र.३) श्री.विनोद पहिलाजराय उर्फ पहिलाज वाधवाणी,** अर्जदार क्र.१ ते ३ सर्व रा.बॅरेक नं.१४९०, रुम नं.१, सेक्शन–३०/बी, हरिओम निवास, गुरुनानक दरबार समोर, उल्हासनगर, ठाणे, सबब अर्जदार हेच **कै.पहिलाजराय उर्फ पहिलाज वाधवाणी,** यांचे कायदेशीर वारस आहेत.

अर्जदार यांनी **कै.पहिलाजराय उर्फ पहिलाज वाधवाणी,** यांच्या मृत्यूच्या पश्चात वारस दाखला मिळणेसाठी मे.दिवाणी न्यायालयात सद–रचा अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करण्यासंबंधी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, अगर तक्रार असल्यास त्यांनी त्यांचे वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात सदर करावी. विहित मुदतीत हरकत सादर न केल्यास मे.न्यायालय योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करतील. तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.२१/०४/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, कल्याण**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, कल्याण**



जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/मोप्र-१/दि.३०/११/२०१८ चे प्रपत्र

**मृद व जलसंधारण विभाग**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी**
**मृद व जलसंधारण विभाग, कळवा, ठाणे. यांचे कार्यालय**
**कडा वसाहत, सहकार विद्यालयासमोर, जुना मुंबई - पुणे रोड, कळवा (प)**
दूरध्वनी क्रमांक - 022-25428127 ई-मेल eemilsdnt@gmail.com

**महाराष्ट्र शासन**

**निविदा सुचना क्र.ब-१/०२/ सन २०२२-२३**

जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे, मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील निविदा सीलबंद लिफाफ्यात मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | तालुका | जिल्हा | निविदा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | घोटवडे बंधारा दुरुस्ती | सुधागड | रायगड | ९०२,५११.०० |
| २ | कळंब बंधारा दुरुस्ती | सुधागड | रायगड | ९०२,४४७.०० |
| ३ | उंबरवाडी बंधारा दुरुस्ती | सुधागड | रायगड | ९०२,२४९.०० |
| ४ | वासुंडे बंधारा दुरुस्ती | सुधागड | रायगड | ९०२,१६२.०० |
| ५ | वावे कातकरवाडी बंधारा दुरुस्ती | सुधागड | रायगड | ८५८,२१४.०० |
| ६ | कळंब ठाकुरवाडी बंधारा दुरुस्ती | सुधागड | रायगड | ९०१,४६८.०० |
| ७ | आरडयाचीवाडी बंधारा दुरुस्ती | सुधागड | रायगड | ९०२,२८६.०० |
| ८ | मुळशी कातकरवाडी बंधारा दुरुस्ती | सुधागड | रायगड | ९०२,३३६.०० |
| ९ | वावे बंधारा दुरुस्ती | सुधागड | रायगड | ९०२,२५३.०० |
| १० | वडाचामाळ धनगरवाडा बंधारा दुरुस्ती | सुधागड | रायगड | ९०१,९००.०० |

**निविदा विक्री कालावधी** :- दिनांक : २७/०४/२०२२ ते दिनांक: ११/०५/२०२२.

**निविदा भरण्याचा कालावधी** :- दिनांक : २७/०४/२०२२ ते दिनांक: १२/०५/२०२२.

**निविदा उघडणे** :- दिनांक : १३/०५/२०२२ (शक्य झाल्यास)

१. कोरे निविदा फॉर्म विक्रीसाठी जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे या कार्यालयात उपरोक्त कालावधीत उपलब्ध असतील.
२. कत्राटदारांनी त्यांच्या पूर्ण भरलेले निविदा उपरोक्त कालावधीत जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे या कार्यालयात सीलबंद लिफाफ्यात सादर कराव्यात
३. निविदेबाबत सर्व माहिती . जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग,कळवा-ठाणे या कार्यालयात सूचना फलकावर उपलब्ध होईल.

जा.क्र.जिजअ/मृवजवि/ठाणे/लेशा-१/१४७७/२०२२
दिनांक :- २०/०४/२०२२
कार्यालय, जिल्हा जलसंधारण अधिकारी
मृद व जलसंधारण विभाग,कळवा-ठाणे

( प्र.व.खेडकर )
जिल्हा जलसंधारण अधिकारी
मृद व जलसंधारण विभाग
कळवा-ठाणे

क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/१८/९४३/२०२२

# संक्षिप्त...

## कामोठे शहरातील कचरा उचलणाऱ्या गाड्यांची संख्या वाढवण्याची शिवसेनेची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे शहरातील कचरा उचलणाऱ्या गाड्यांची संख्या वाढवण्याची मागणी शिवसेनेने पनवेल महानगरपालिकेकडे केली आहे.

शिवसेना कामोठे शहरप्रमुख राकेश गोवारी यांच्या मार्गदर्शनाखाली विभागप्रमुख संतोष गोळे यांनी पनवेल महानगरपालिकेला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कामोठे वसाहतीमध्ये कचऱ्याची समस्या वाढत चालली असून सदर कचरा उचलण्यासाठी असणाऱ्या वाहनांची संख्या कमी असल्याने कचरा रस्त्यावरच पडून राहतो त्यातूनच रोगराई वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे तरी पनवेल महानगरपालिकेने तातडीने कचरा उचलणाऱ्या गाड्यांची संख्या वाढवावी व कचरामुक्त कामोठे करावे अशी मागणी विभागप्रमुख संतोष गोळे यांनी केली आहे.

## कळंबोली येथून तरुणी बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एक १९ वर्षे मुलगी ही तिच्या लहान बहिणीस शाळेतून घेवून येण्याच्या बहाण्याने राहत्या घरातून बाहेर पडून लहान बहिणीच्या शाळेसमोरून कोणास काही न सांगता स्वतहून निघून गेल्याने याबाबतची तक्रार तिच्या कुटुंबियाने कळंबोली पोलिस ठाण्यात दिली आहे.

कु. प्रतिभा राजेश कुशवाह (वय १९, राहणार – सेक्टर–१, कळंबोली) असे या मुलीचे नाव असून तिचा रंग सावळा, उंची ५ फुट, बांधा–सडपातळ, केस काळे व लांब कंबरेपर्यंत, डोळे काळे, चेहरा उमट, पेहराव गुलाबी रंगाचा कुर्ता, निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट, व काळ्या रंगाची ओढणी, नाकात नथणी घातलेली आहे, पायात चप्पल, ओळखीचे चिन्ह डाव्या हाताच्या मनगटावर जुना कापल्याचा व्रण आहे. तिला मराठी, हिंदी बोलता येते. या मुलीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कळंबोली पोलिस ठाणे किंवा पो.ना. किशोर म्हात्रे यांच्याशी संपर्क साधावा.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# पत्रकारांच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध : ना. आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । माणगाव**

शहरी भागापेक्षा ग्रामिण भागातील पत्रकारिता ही खरी सजग पत्रकारिता आहे. मात्र आजच्या काळात केवळ पत्रकारिता करून आपले कुटुंब चालविणे अशक्य असल्याने पत्रकारांनी या क्षेत्राशी निगडीत असलेले अन्य कौशल्य जाणून घेणे गरजेचे असल्याचा मौलिक सल्ला ज्येष्ठ माध्यमकर्णी समीरण वाळवेकर यांनी दिला. पत्रकारांची पेन्शन, त्यांच्यावर होणारे हल्ले रोखण्यासाठी कठोर कायद्याची अंमलबजावणी आदी प्रश्न सोडवण्याचा सरकारच्या माध्यमातून प्रयत्न केला जाईल असे आश्वासन रायगडच्या पालकमंत्री ना. आदिती तटकरे यांनी दिले.



रायगड प्रेस क्लबच्या १६ व्या वर्धापन दिन व पत्रकार सन्मान सोहळा रायगड प्रेस क्लब व माणगांव प्रेस क्लबच्या संयुक्त विद्यमाने माणगांव येथील कुणबी भवन येथे आयोजित केला होता. या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ माध्यम कर्णी समीरण वाळवेकर व प्रमुख अतिथी म्हणून ना. आदिती तटकरे बोलत होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी रायगड प्रेस क्लबचे मार्गदर्शक एस.एम.देशमुख होते. व्यासपीठावर मराठी पत्रकार परिषदेचे कार्याध्यक्ष शरद पाबळे, कोकण विभाग मराठी पत्रकार परिषद सचिव विजय मोकल, मेघराज जाधव, रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष भारत रांजणकर, माजी अध्यक्ष अनिल भोळे, अभय आपटे, मिलिंद अष्टीवकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सुरुवातीस आपल्या प्रास्ताविकामध्ये भारत रांजणकर यांनी एस.एम.देशमुख यांनी तरुण पत्रकारांना एकत्र करून २००५ साली रायगड प्रेस क्लबची स्थापना केली. गेली १६ वर्षे विविध सामाजिक प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न संघटनेमार्फत केला जात आहे.घोणसे घाट, मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग आंदोलन, महामार्गाचे बाळ शास्त्री जांभेकर महामार्ग नामकरण, पाणीटंचाई निवारणासाठी उपक्रम, बांधावर जाऊन शेतकरी सन्मान असे उपक्रम संघटनेने राबवले आहे. रायगड प्रेस क्लबने सुरु केलेला बांधावर जाऊन शेतकरी सन्मान हा उपक्रम शासनाने सुरु केला हे प्रेस क्लबचे यश आहे असे सांगितले.

एस.एम.देशमुख यांनी आजही पत्रकारांचे अनेक प्रश्न सरकार दरबारी प्रलंबित असून माहिती खात्याच्या मंत्री म्हणून पत्रकारांचे प्रश्न सोडवण्यासाठी रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी केली. ३०० ज्येष्ठ पत्रकारांना जरी पेन्शन सुरु झाली असली तर आणखी ३०० पत्रकार शासनाच्या जाचक अटी व शर्ती यामुळे पेन्शन योजनेपासून वंचित आहेत. पत्रकारांवरील हल्ले वाढत असून पत्रकार हल्लयाविरोधी कायद्याची अंमलबजावणी होत नाही असे सांगितले. मुंबई गोवा महामार्गाला बाळशास्त्री जांभेकर यांचे नांव शासनाने द्यावे या मागणीसाठी १७ मे रोजी राज्यभरात तालुकास्तरावर आंदोलन करून शासनाला निवेदन देण्यात येणार असल्याची घोषणा देशमुख यांनी केली.

ना. आदिती तटकरे यांनी देशमुख यांच्या मागणीचा संदर्भ देत पत्रकार पेन्शन योजनेसाठी असणारा ३० वर्षाचा अनुभव कमी करून तो २८ वर्ष असा केला आहे त्यासाठी ३५ कोटीची तरतूद केली आहे.त्याच बरोबर पत्रकार हल्ला विरोधी कायद्याच्या अंमलबजावणी संदर्भात गृह विभागाला सूचना देण्यात आल्या असल्याचे तटकरे यांनी सांगितले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते पत्रकार सन्मान पुरस्कार व विविध क्षेत्रातील पुरस्कारांचे मान्यवरांचे हस्ते वाटप करण्यात आले. आचार्य अत्रे राज्यस्तरीय युवा संपादक अजित वरपे ( संपादक दैनिक झुंजार नेता बीड ), जीवन गौरव पुरस्कार विजय मांडे कर्जत, स्व. निशिकांत जोशी स्मृती ज्येष्ठ पत्रकार पुरस्कार मेघराज जाधव मुरुड, उदय कळस म्हसळा, स्व. प्रकाश काटदरे स्मृती निर्भिड पत्रकार पुरस्कार प्रफुल्ल पवार अलिबाग, स्व. संतोष पवार स्मृती युवा पत्रकार पुरस्कार हरेश मोरे साई, सावित्रीबाई फुले महिला पत्रकारिता पुरस्कार सीमा मोरे, उत्कृष्ट छाया चित्रकार पुरस्कार प्रकाश माळी पेण, प्रसाद पाटील महाड , श्रमिक पुरस्कार नंदकुमार मरवडे रोहा, आनंद पवार रसायनी, संतोष शिलकर श्रीवर्धन, एस.टी. पाटील खालापूर यांना देण्यात आला. तर सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार संजय अण्णा ढवळे, बाबुशेठ खानविलकर, आरोग्य सेवा पुरस्कार डॉ. इस्माईल रहाटविलकर, यशस्वी मराठी उद्योजक पुरस्कार दिपक जाधव, संतोष वरपे, डॉ. संजय सोनावणे यांना प्रदान करण्यात आला. सुत्रसंचलन सुधीर शेठ तर आभार कार्याध्यक्ष मनोज खांबे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी माणगांव प्रेस क्लबचे अध्यक्ष संतोष सुतार, पदमाकर उभारे, गौतम जाधव, हरेश मोरे,सचिन वनारसे, आरती महामुणकर, उत्तम तांबे, वैभव टेंबे,पुनम धुमाळ आदी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हाध्यक्ष भारत रांजणकर, कार्याध्यक्ष मनोज खांबे, माजी जिल्हाध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, विजय मोकल, अनिल भोळे तसेच रायगड जिल्हा प्रेस क्लबची कमिटी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# श्रीवर्धन पर्यटनस्थळांवर पार्किंगची सुविधा गरजेची

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुका हा पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. दिवेआगर तसेच श्रीवर्धन व हरिहरेश्वर येथे धार्मिक व समुद्रकिनारी फिरण्यासाठी शेकडो पर्यटक पुणे व मुंबईहून येत असतात. पण, या पर्यटनस्थळांवर येण्यासाठी अनेक अग्निदिव्ये पार करण्याची वेळ पर्यटकांवर येत आहे. शहरात होत असलेली बेकायदा पार्किंगमुळे ही समस्या अधिकच बिकट झाली आहे.

श्रीवर्धन तालुक्याला लाभलेला किनारपट्टीचा परिसर हा नेहमीच पर्यटकांचे आकर्षण राहिले आहे. यासाठी मुंबई–गोवा महामार्गावरील माणगाव शहरातून श्रीवर्धन तालुक्यात जावे लागतात. पण, तालुक्याच्या प्रवेशद्वारावर होणारी वाहतूक कोंडी पर्यटकांसाठी डोकेदुखी ठरत आहे.

या मार्गावर नेहमीच वाहनांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या असतात. शहरातील रस्त्यांवर होणारी बेकायदा पार्किंगदेखील एक कारण आहे. याशिवाय तालुक्यात पार्किंगच्या अनुषंगाने कोणतेही धोरण नसल्याने त्याचा परिणाम पर्यटनावर झालेला आहे.

# अन...संतप्त गावकऱ्यांनी अधिकाऱ्यांना पाजले गढूळ व खारे पाणी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील अनेक गावे व वाड्या वस्त्यात सद्यस्थितीत पाण्याची भीषण टंचाई आहे. हंडाभर पाण्यासाठी महिला रखरखत्या उन्हात वणवण भटकत आहेत.



पेण विभाग हे भरपूर पाऊस पडणारे तसेच हेटवणे, शाहपाडा, बाळगंगा इत्यादी धरणे व जलस्त्रोत असलेले, भोगावती नदी , तलावं असे मुबलक जलसाठे असलेले आहे. परंतु तालुक्यातील पाणी प्रश्न गेली वीस – पंचवीस वर्ष हा कायमचाच बारा महिने सुरू आहे. येथील नागरिकांना शुद्ध व मुबलक पाणी मिळावे या मागणी साठी आज प्रांताधिकारी कार्यालय पेण येथे भारतीय महिला फेडरेशन व खारेपाट विभागाच्या माध्यमातून मोहिनी गोरे यांच्या नेतृत्वाखाली प्रांताधिकारी कार्यालयावर पाण्यासाठी आंदोलन करण्यात आले. यावेळी संतप्त आंदोलक व गावकऱ्यांनी अधिकाऱ्यांना गढूळ व खारे पाणी पाजले. तुम्ही एक दिवस हे पाणी पिऊ शकत नाही आम्ही वर्षाचे १२ महिने हे पाणी पितो, आम्ही गुरे ढोरे आहोत का? असा सवाल महिलांनी उपस्थित केला. यावेळी विविध मागण्या करण्यात आल्या.

येथील रखडलेले पाणी प्रकल्प पूर्ण करावे. हेटवणे ते शाहपाडा वाढीव पाणी प्रकल्प, दक्षिण शाहपाडा कालवा, डावातीर कालवा, बाणगंगा पाणी प्रकल्प त्वरित पूर्ण करावे. कालवा धरणातील व इतर पाणीसाठ्यातील गाळ काढणे. २) सिडको किंवा जेएसडब्ल्यू असे पाण्याचे कंपनीकरण थांबवून महाराष्ट्र शासन तसेच महाराष्ट्र जल जीवन प्राधिकरणांकडे सर्व पाण्याचे नियोजन द्यावे. आदि मागण्या करण्यात आल्या. पाणी प्रश्नावर यापूर्वी २ मार्च , २०२२ ला पाणी प्रश्नासंदर्भात मोठे महिला आंदोलन झाले. त्या बैठकीतील चर्चेनुसार ३१ मार्च ते १५ एप्रिलपर्यंत कामे होतील असे सांगण्यात आले. २५ मार्च रोजी १५० महिलांच्या सह्यांचे स्मरणपत्राद्वारे पाणी प्रश्न संदर्भात पाठपुरावा केलेला होता. कडक उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणी प्रकल्पाबाबत सुरू असलेल्या कामाची माहिती मिळावी या मागणी बरोबर सध्या जो काही अपुरा पाणी पुरवठा होत आहे तो किमान शुध्द मिळावा अशी विनंती केली होती. त्यास प्रशासनाकडून कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही. राजकीय नेते आश्वासनाचे पिक आनंतात पण कृती मात्र शून्य असते अशी नाराजी आन्दोलकांनी व्यक्त केली. जोपर्यंत शुद्ध व मुबलक पाणी मिळत नाही तोपर्यंत आंदोलन सुरुच राहिल अशी भूमिका आन्दोलकांनी मांडली. या आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते मोहिनी गोरे, मनसे चे युवा नेते संदीप ठाकूर, विजयभाऊ पाटील, दिलीप पाटील, किरण म्हात्रे, माधुरी ठाकूर , देवेंद्र कोळी, हेमंत पाटील, साक्षी पाटील, अपर्णा म्हात्रे, सुषमा पाटील, रंजिता ठाकूर, चंद्रकांत म्हात्रे, जयसन आदींसह महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाड तालुक्यातील दरडग्रस्त व पूरग्रस्त गावातील नागरिकांनी प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ घ्यावा : सुरेश काशिद

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

नैसर्गिक आपत्ती उपाययोजना म्हणून महाड तालुक्यातील दरडग्रस्त गावे व पूरग्रस्त गावे येथील नागरिकांकरिता प्रत्येक मंडळामध्ये प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हे प्रशिक्षण नागरी संरक्षण दल यांच्यामार्फत देण्यात येणार असून प्रशिक्षण कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे––– महाड येथे दि.२५ एप्रिल २०२२ रोजी सकाळी ११.०० वा. चवदार तळे येथील हॉलमध्ये उद्घाटन कार्यक्रम. दि.२६ ते २९ एप्रिल २०२२ या कालावधीत सकाळी ६.०० ते १०.३० या वेळेत चवदार तळे हॉलमध्ये प्रशिक्षण कार्यक्रम.

गोंडाळे मंडळात सुतारकोंड येथील भैरवनाथ मंदिर येथे दि.२ ते ६ मे २०२२ या कालावधीत सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वा., नाते मंडळात, रायगड जिल्हा परिषद शाळा, हिरकणीवाडी, रायगडवाडी येथे दि. २ ते ६ मे २०२२ या कालावधीत दुपारी ३.०० ते सायंकाळी ६.०० वा., शिरगाव मंडळात, काळभैरव मंदिर शिरगाव येथे दि.२ ते ६ मे २०२२ या कालावधीत सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वा., बिरवाडी मंडळात, ग्रामपंचायत हॉल बिरवाडी येथे दि.२ ते ६ मे २०२२ या कालावधीत दुपारी ३.०० ते सायंकाळी ६.०० वा., मांघरुण मंडळात, समाज मंदिर मांघरुण येथे दि.७ ते ११ मे २०२२ या कालावधीत सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वा., तुडील मंडळात, दत्तमंदिर अप्पर तुडील येथे दि.७ ते ११ मे २०२२ या कालावधीत दुपारी ३.०० ते सायंकाळी ६.०० वा., करंजाडी मंडळात, ग्रामपंचायत कार्यालय, करंजाडी येथे दि.७ ते ११ मे २०२२ या कालावधीत सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वा., खरवली मंडळात, तलाठी कार्यालय, खरवली येथे दि.७ ते ११ मे २०२२ या कालावधीत दुपारी ३.०० ते सायंकाळी ६.०० वा.

अशा प्रकारे महाड तालुक्यातील दरडग्रस्त गावे व पूरग्रस्त गावे येथील नागरिकांकरिता प्रत्येक मंडळात पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या प्रशिक्षणाचा लाभ महाड दरडग्रस्त गावे व पूरग्रस्त गावे येथील नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन तहलिसदार महाड सुरेश काशिद यांनी केले आहे.


प्रो.जमा.६–२५ **अर्जदाराचे वकील**
**ॲड.विलास पाटील**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्र.४८४/२०२२
नि.क्र.७/ड
ने.ता.२६/०५/२०२२

**श्री.गजानन काळुराम पाटील**
वय : ३३ वर्षे, धंदा : नोकरी
रा.आकुर्ली, पो.आदई, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक
ग्रामपंचायत – आकुर्ली
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **श्री.गजानन काळुराम पाटील** यांचे वडील **कै.काळुराम महादू पाटील** हे दि.१८/०३/२०१८ रोजी मौजे : आकुर्ली, पो.आदई, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी मयत झालेले आहेत. अर्जदार यांनी **कै.काळुराम महादू पाटील** यांच्या मृत्यूची नोंद होणेकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. याचे न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार यांचे वडील **कै.काळुराम महादू पाटील** हे वर नमूद ठिकाणी मयत झाले आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसच्या तारखेपासून ३० दिवसांचे आत हरकतदाराने आपल्या हरकती या मे.न्यायालयात हजर होवून कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास मे.न्यायालय वर नमूद अर्जदार यांचेकडून पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आपल्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २२/०४/२०२२

**सही/–**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**



### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, **मौजे : महोदर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड** येथील खाली वर्णन केलेली जमीन मिळकत ही **मुळ जमीन मालकांकडून** मी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : महोदर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गांव | भोगवटादाराचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| महोदर | प्रेमा गोविंद पाटील | २४७/८ | ०–०६–००<br>पोटखराबा ०–०२–३०<br>एकूण क्षेत्र ०–०८–३० | ०.८७ |

सदरहू जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षिस, लीज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार–मदार, मालकी, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४ दिवसांच्या आत** आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह **खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे.** जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न झाल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन मी वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करेन व विहित मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी या माझेवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २२/०४/२०२२

**सही/–**
**श्री.धर्मा काळुराम पोपेटा**
**रा.कळंबोली, पो.कळंबोली,**
**ता.पनवेल, जि.रायगड–४१०२१८**
**मोबा नं.७२०८८१९७९२**



## पनवेल महानगरपालिका
### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेवून उक्त अधिनिय कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | श्री.हसीब युसुफ मुल्ला, २८० महात्मा गांधी रोड, पनवेल | ०२ नारळ, ०२ करंज, ०१ जांभूळ, ०१ उंबर, ०१ जंगली अशी ०७ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील मे.मगदूमबीबी वक्फ ट्रस्ट तर्फे चीफ ट्रस्टी श्री.हासिब युसूफ मुल्ला, अंतिम भूखंड क्रमांक २८०, पनवेल हा भूखंड विकसित करण्यास सुरूवात करणार आहोत तशी रितसर आम्ही पनवेल महानगरपालिका कडून बांधकाम करण्यास परवानगी घेतलेली आहे. परंतु वरील भूखंडात जुनी छोटी झाडे आहेत व ती आम्हास इमारत बांधकामास अडथळे निर्माण होत आहेत तशी झाडे मी नकाशाद्वारे आपल्या निदर्शनात आणून देत आहे. ती तोडण्याची परवानगी मिळणेबाबत. |
| २ | श्री.अमोल महादेव वाघमारे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, २२० के.व्ही., ओ.एन.जी.सी. उपकेंद्र, पनवेल | ०३ आंबा व ०१ नारळ अशी एकूण ०४ झाडे तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहर व ग्रामीण भागामध्ये म.रा.वि.पा कंपनी मार्फत अखंडीत आणि अविरहित वीज पुरवठा केला जात अहे. सदर वीज पुरवठा २२० के.व्ही. ओ.एन.जी.सी. उपकेंद्र फेज २ काळुंद्रे येथूनच होत आहे. सध्या पनवेल शहर व ग्रामीण भागांचा विकास झपाट्याने होत असून त्याच बरोबर विजेची मागणी अतिप्रमाणात होत आहे. कंट्रोल रुम वाढविण्यासाठी कंट्रोल रुमचे क्षेत्रफळ वाढविण्याचे ठरले असून त्याकामी जुन्या कंट्रोल रुम बाहेरील काही वृक्षतोड करणेसाठी आपल्या परवानगीची अतिशय गरज आहे. त्याकारणाने वृक्षतोड करण्यास परवानगी मिळणेबाबत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सुचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सुचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

जा.क्र.पमपा/उद्यान/२१२२/प्र.क्र.३२/१९१/२०२२
दिनांक : २२/०४/२०२२

**सही/–**
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**